सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक क्र. ३२०/२०२५

**विषय : केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पातील परीक्षक, नियंत्रक (Examiner & Moderators) आणि विद्यापीठामध्ये पेपर सेटींगसाठी येणाऱ्या प्राश्निकांच्या दैनिक भत्याबाबत...**

केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पामध्ये परीक्षक आणि नियंत्रक पेपर तपासण्यासाठी येत असतात. त्यांना विद्यापीठ नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता अदा करण्यात येतो. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पामध्ये येणाऱ्या परीक्षक, नियंत्रक आणि विद्यापीठामध्ये पेपर सेटींगसाठी येणाऱ्या प्राश्निकांना वित्त विभागाचे परिपत्रक क्र. वित्त/२०१४-१५/६६० दि. २३/०२/२०१५ आणि वित्त/२०१५-१६/३५० दि. २१/१०/२०१५ नुसार रु. ७५०/- या दराने दैनिक भत्ता अदा करण्यात येत होता. तसेच, वरील परिपत्रकामध्ये नेमक्या किती किलोमीटर नंतर हॉटेल वास्तव्याच्या पावतीशिवाय रु. ७५०/- या दराने दैनिक भत्ता अदा करण्यात यावा, याचा स्पष्ट उल्लेख केलेला नसल्यामुळे केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पामध्ये संभ्रम होता.

सबब मा. व्यवस्थापन परिषद ठराव क्र. म.३१२/०९०९२५ नुसार **ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२५** च्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पापासून परीक्षक/नियंत्रक त्यांचे महाविद्यालय ते केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प यामधील अंतर ५० किलोमीटरपेक्षा जास्त असेल, तरच हॉटेल वास्तव्याच्या पावतीशिवाय रु. ७५०/- दराने दैनिक भत्ता अदा करण्यात यावा. पेपर सेटींग, पुर्नरमूल्यांकनासाठी विद्यापीठामध्ये येणारे प्राश्निक/परीक्षक यांचे महाविद्यालय ते विद्यापीठ यामधील अंतर ५० किलोमीटरपेक्षा जास्त असेल तरच, हॉटेल वास्तव्याच्या पावतीशिवाय रु. ७५०/- दराने दैनिक भत्ता अदा करण्यात यावा. सदर दैनिक भत्ता दोन किंवा त्यापेक्षा जास्तीच्या सलग दिवसासाठी जर हॉटेल वास्तव्य केलेले असेल तरच देय असेल. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प व पेपर सेटींगसाठी विद्यापीठामध्ये येणारे परीक्षक/नियंत्रक आणि प्राश्निक शेवटच्या दिवशी रु. ७५०/- दैनिक भत्ता देय होणार नाही. जरी, हॉटेल वास्तव्याच्या पावतीशिवाय दैनिक भत्ता देण्यात येत असला तरी, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प संचालकांना आवश्यक असल्यास, हॉटेल वास्तव्याची पावती परिक्षक/नियंत्रक यांनी सादर करावी.

वरील सर्व बाबींची नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करून वित्त व लेखा विभागास सहकार्य करावे, ही विनंती.

गणेशखिंड, पुणे-४११००७
**जा.क्र.:** वित्त/२०२५-२६/६९३
**दिनांक :** २२/१२/२०२५

(सीएमए (डॉ.) चारुशीला गायके)
**वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सा.फु.पु.वि. पुणे-७
२. मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
३. मा. संचालक, विद्यापीठाशी संलग्नित मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था
४. सर्व संचालक, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प, सा.फु.पु.वि. पुणे-७

आपणांस विनंती की, सदर परिपत्रक सर्वांच्या निदर्शनास आणावे.